|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

1990 'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/१४/विवि/साहित्य सृजन/ १५ /२०२५ दि.१७/०१/२०२५

**प्रति,**

१) मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,
जळगाव जिल्हयातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था व

२) मा. संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना -

**विषयः- जळगाव जिल्हास्तरीय साहित्य सृजन कौशल्य कार्यशाळेस विद्यार्थी पाठविण्याबाबत.....**

**संदर्भः- १)** विद्यापीठ परिपत्रक क्र.कबचौउमवि/१४/विवि-४६/१४४/२०२४, दि.१२/०७/२०२४
२) जा.क्र.कबचौउमवि/१४/विवि-४०/सा.सृ/१८२/२०२४ दि.२४/१२/२०२४

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदविका, पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रगतीच्या आलेखाबरोबरच अभ्यासेत्तर उपक्रमात सहभाग वाढावा या उद्देशाने याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कला गुणांचा विकास व्हावा, या उद्देशान्वये काही नवीन कार्यशाळा सुरु करण्यात आलेल्या असून त्यापैकी एक जिल्हास्तरीय साहित्य सृजन कौशल्य कार्यशाळा सुरु करण्यात आलेली आहे. सदर कार्यशाळेत **काव्यवाचन, कथाकथन, नाटयलेखन, वकृत्व, वादविवाद व सुत्रसंचालन** या कला प्रकाराबाबत तज्ञ मार्गदर्शक बोलावून मार्गदर्शन केले जाते. याच उद्देशाने **जळगाव जिल्हास्तरीय साहित्य सृजन कौशल्य कार्यशाळेचे** आयोजन **दि.२९ ते ३१ जानेवारी २०२५** रोजी विद्यार्थी विकास विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. व वि.भा.शै.मं.अमरावती व्दारा संचलीत **संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगाव** यांच्या संयुक्त विद्यमाने **संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि.जळगाव. येथे** आयोजित करण्यात येत आहे.

सदर कार्यशाळेत आपल्या महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा विभाग मधील खालील निकषानुसार जास्तीतजास्त **०६ विद्यार्थी / विद्यार्थिनी** निवड करुन पाठवावेत, ही विनंती.

* कार्यशाळेत सहभागी होणारे विद्यार्थी / विद्यार्थीनी यांना वरीलपैकी एक कला अवगत असावी, त्या विषयी आवड, नैपुण्य, असणारे असावे.
* कार्यशाळेत सहभागी होणारे विद्यार्थी / विद्यार्थीनी या शैक्षणिक वर्षात (सन २०२४-२५) नियमित शिक्षण घेणारे असावेत. त्याच्या / तिच्याकडे अद्यावत (प्राचार्य / संचालक यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.

कृपया निकषानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा, अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत निःशुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्याजाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

**कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**

* साहित्य सृजन कौशल्य कार्यशाळा उद्घाटन सोहळा **दि. २९ जानेवारी २०२५** रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकाळी ९.३० वाजेपर्यंत कार्यशाळा स्थळी उपस्थित राहणे अगत्याचे आहे.

.. २

* कार्यशाळेस केवळ ०६ विद्यार्थी / विद्यार्थिनी यांचीच निवड करुन त्यांना पाठवावे. एकूण ०६ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. तसेच महाविद्यालयातून गटप्रमुख म्हणून एखाद्या प्राध्यापकास पाठवू नये. विद्यार्थ्यांसोबत आयोजक महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी त्यांच्या मदती व मार्गदर्शनासाठी उपलब्ध असतील.

* कार्यशाळेत विद्यार्थ्यांची गटवार विभागणी करण्यात येत असल्याने त्यांना मिळालेल्या गटातच प्रशिक्षण व कला सादर करणे बंधनकारक राहिल.

* निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा/ही महाविद्यालयातील नियमित प्रवेशित असावा/ असावी व त्याच्या/ तिच्या कडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृपया स्पर्धेसाठी पाठवू नये.

* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**

१. मा. प्राचार्य डॉ. इंद्रसिंग दगडू पाटील, भ्रमणध्वनी क्र. ८२०८९९१५७०
ई-मेल - smcmuk@gmail.com

२. डॉ.रमेश ना.शेवाळे, विद्यार्थी विकास अधिकारी, भ्रमणध्वनी क्र. ९८६००२११४१
ई-मेल - rameshsheale222@gmail.com

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुनःश्च कळवितो की, साहित्य सृजन कौशल्य कार्यशाळेत निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि.२७/०१/२०२५** पर्यंत **संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि.जळगाव.** यांना ईमेल smcmuk@gmail.com वर पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठ **www.nmu.ac.in** या संकेत स्थळ व विद्यार्थी विकास विभागाच्या पोर्टलवर उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

17-1-2025

(डॉ.जयेंद्र दि.लेकुरवाळे)
संचालक, विद्यार्थी विकास

* **सोबत** :- प्रवेशिका

* **प्रतिलिपी :-**

१. मा.प्राचार्य, संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, मुक्ताईनगर,जि.जळगाव.
२. डॉ. संजय का.पाटील, जळगाव जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, पंकज महाविद्यालय, चोपडा.
३. मा.वित्त व लेखा विभाग, कबचौउमवि, जळगाव
४. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
५. पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

**प्रत :-**

१. विभाग प्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
२. विभाग प्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
३. विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.

Xpdata/mpp24-25/ Sahitya Srujan koushalya workshop24-25

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

# विद्यार्थी स्वयंवृत्त
## जळगाव जिल्हास्तरीय साहित्य सृजन कौशल्य कार्यशाळा

१) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- ------------------------------------------------------------

२) वर्ग :-------------

३) जन्म तारीख :- / /

४) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही

५) रक्त गट :- ------

६) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- ---------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------

७) भ्रमणध्वनी क्र. :-

०९) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळा यांचे नाव :- --------------------------------------------------

१०) ओळखपत्र क्र. :-------------------

१२) विद्यार्थी विकास उपक्रम सहभाग :- -----------------------------------------------------------
-------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------

१३) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- -----------------------------------------------------------
-------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------

( )

**विद्यार्थी / विद्यार्थीनीची सही व नाव**

---

### -: पालकाचे संमती पत्र :-

संमती पत्र लिहून देतो /देते की, श्री/सौ. ----------------------------------------- माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे ----------------------------------- हा / ही सदर कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहानी दावा करणार नाही.

**पालक / वडील / आई यांचे नाव व स्वाक्षरी**

---

### -: महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा यांचे शिफारस पत्र :-

विद्यार्थी नाव ------------------------------ हा/ही नियमित शिक्षण घेत असून नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. जळगाव जिल्हास्तरीय साहित्य सृजन कौशल्य कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /२०२५

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/संचालक**
सही व शिक्का